**<u>वादी करीता साक्षीदार क्र.१ यांची जबानी</u>**

**<u>अर्ज (नि.क्र.६७) व त्यावरील आदेशान्वये प्रतिवादी क्र.१ ते ३ करीता पुढील सरतपास विधीज्ञ श्री. के. व्ही. पंढरीकर यांच्या तर्फे सुरू</u>**

१. दावा मिळकत सर्वे क्र.११६ मध्ये आहे. सर्वे क्र.११६ व सर्वे क्र.१०८ यामध्ये पाणंद रस्ता आहे हे म्हणणे खरे नाही. भिंगोले यांनी मला पाणंद रस्त्याचा काही भाग विक्री केला हे म्हणणे खरे नाही. सर्वे क्र.११६ चा अकृषी उतारा मी दाखल करु शकतो. सर्वे क्र.११६ चा अकृषी उतारा मी दाखल करु शकत नाही. दावा मिळकतीचा अकृषी उतारा मी पाहिलेला आहे. दावा मिळकतीचा केव्हाच अकृषी झालेला नाही हे म्हणणे खरे नाही. खरेदीखत क्र.३६२/२००६ आणि चुक–दुरुस्ती दस्त क्र. ३७६३/२००६ या दोन्ही दस्ताचे मुद्रांक मी स्वत: आणले हे म्हणणे खरे आहे. त्या दोन्ही दस्तातील संपूर्ण मजकूर दस्त लिहिणाऱ्यास मीच सांगितला होता हे म्हणणे खरे आहे, साक्षीदार पुढे स्वत: सांगतात तेथे मी व देणार हजर होतो. दावा मिळकतीवर मोठ्या लाल रंगाच्या वीटांचे बांधकाम व त्यावर पत्रे आहेत. ग्रामपंचायतकडून बांधकाम परवाना मागणी करत असताना माझ्या मिळकतीचा बांधकाम योजनेचा नकाशा जोडला होता. तो नकाशा मी दाखल करु शकतो. ग्रामपंचायतने मला औराद ते कोटमाळ जाणाऱ्या पाणंद रस्त्यावर बांधकाम करण्यासाठी परवानगी दिलेली नव्हती. फेब्रुवारी आणि मार्च २०२० मध्ये समितीने कोटमाळ रस्त्याची हद्द कायम केली हे म्हणणे खरे नाही. कोटमाळ रस्त्याची हद्द कायम केलेबाबत मला माहीती नाही. कोटमाळ रस्त्याची हद्द कायम केल्याबाबत मी काहीएक कागद

पाहिलेला नाही. कोटमाळ रस्त्याची हद्द कायम केलेबाबत मी उपअधीक्षक भूमीअभिलेख, निलंगा यांच्याकडील नकाशा दाखल केला आहे. दावा दाखल करण्याच्या एक महिन्यापुर्वी मी नकाशा मिळविण्यासाठी अर्ज केला होता. नकाशावर दावा मिळकत दाखविलेली नाही. ग्रामपंचायतने दिलेल्या नोटीसच्या नंतर मी त्यावर तहसीलदार किंवा जिल्हाधिकारी यांना दावा दाखल करण्याची नोटीस किंवा कल्पना दिलेली नाही. साक्षीदार स्वत: सांगतात की, मी शासकीय अधिकाऱ्यांना भेटलो होतो. मी ८५.६ चौरस मीटर क्षेत्राचे कोटमाळ रस्त्यावर अतिक्रमण केले हे म्हणणे खरे नाही. पाणंद रस्त्याच्याबाबत मी मोजणी करुन घेतली नाही. ग्रामपंचायतने मला चुकीची व खोटी नोटीस दिल्याचे मी खोटे सांगत आहे हे म्हणणे खरे नाही. दिनांक १८.०१.२०२० रोजी मी तहसीलदार, निलंगा किंवा जिल्हाधिकारी, लातूर यांना भेटलो नाही. तहसीलदार, निलंगा किंवा जिल्हाधिकारी, लातूर यांच्याविरुध्द मला सन २०२० साली तक्रार नव्हती व आजही नाही. पाणंद रस्त्याची जागा हडप करण्याच्या उद्देशाने मी खोटी साक्ष देत आहे हे म्हणणे खरे नाही. माझ्या सरतपासातील मजकूर खोटा आहे हे म्हणणे खरे नाही.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास पूर्ण.**

श्रवणोत्तर स्विकृत

Digitally signed by PANDE RAVI VIJAYPRASAD
Date: 2025.10.28 17:50:33 +0530

(रवि वि. पांडे)

दि.२८/१०/२०२५

दिवाणी न्यायाधीश, व.स्तर,
निलंगा, जि.लातूर